स्थायी समितीच्या **शनिवार दिनांक 01–12–2018** रोजी **दुपारी 03–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. श्री.विरेन्द्र उर्फ विक्की घनश्यामदास कुकरेजा | सभापती |
| 2. | मा. श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |
| 3. | मा. श्री.सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य |
| 4. | मा. श्री.महेश केशवराव महाजन | सदस्य |
| 5. | मा. श्री.शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य |
| 6. | मा. सौ. मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या |
| 7. | मा. श्री. नागेश महादेव मानकर | सदस्य |
| 8. | मा. श्री. भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. सौ. सोनाली शालीक कडु | सदस्या |
| 2. | मा. सौ. मंगला शशांक खेकरे | सदस्या |
| 3. | मा. सौ. हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या |
| 4. | मा. सौ. कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| 5. | मा. सौ. अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| 6. | मा. सौ. विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| 7. | मा. सौ. अभिरूची अनिल राजगिरे | सदस्या |
| 8. | मा. सौ. मंगला योगीराज लांजेवार | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री रविन्द्र ठाकरे, अति. आयुक्त (3) (शिक्षण व आरोग्य)
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**ठराव क्रमांक 382ः–** {जाहिरात विभाग} नागपूर येथील क्लॉक टॉवर उभारण्यात आले आहे. त्या सभोतालचे परिसराचे विकास/सौंदर्यीकरण व रखरखाव करण्याच्या अटीवर नागपूर शहरात एकुण सात पैकी सहा ठिकाणी गॅन्ट्री उभारुन बि.ओ.टी. तत्वावर १० वर्षाकरीता जाहिरातीचे हक्क प्रदान करण्यास्तव निविदा प्रस्ताव तयार आला. सदर प्रस्तावास स्थायी समिती ठराव क्र. १२८, दिनाक २५.०६.२०१८ नुसार विभागाने १० वर्षा ऐवजी ३ वर्षाचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले व त्याप्रमाणे ठराव मंजुर केलेला आहे. सदर्हु ठरावास मा. आयुक्त यांनी दिनांक ०२.०७.२०१८ रोजी कार्यान्वीत करण्यास मंजुरी दिली आहे.

या अनुषंगाने १० वर्षा ऐवजी ३ वर्षाकरीता निविदा बोलविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन क्लॉक टॉवरची सुस्थिती व दुरुस्ती करण्याबाबत महा मेट्रोला पत्र पाठवावे त्यांचे उत्तर प्राप्त झाल्यावर पुन्हा स्थायी समिती समोर हा प्रस्ताव पाठवावा. तोपर्यंत विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 383ः—** **{विद्युत विभाग}** नागपूर महानगरपालिकेतील मुख्यालयातील नविन प्रशासकीय इमारतीमधील सातव्या माळयावरील स्मार्ट सिटी व सस्टेनेबल डेव्हल्पमेंट कॉर्पोरे”ान लि., नागपूर कार्यालयामध्ये वातानुकूलित व्यवस्था करण्याकरीता में. जेनटेक इंजिनिअरिंग सर्व्हिसेस, नागपूर यांची प्राकलनीय रकमेच्या तुलनेत 13.5% ने कमी असलेली रू. 30,71,157/— ची निम्मनतम दराची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 384ः—** **{लोककर्म झोन ४}** प्रभाग क्र. 17 क, अंतर्गत जोशी वाडी येथे श्री शंभरकर ते बन्सोड व श्री गजमे यांचे घरापर्यंत रोडचे सिमेंटीरण करण्याचे कामास्तव विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या रूपये 2916573/- रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करून निविदा काढण्याचा व या आर्थिक वर्षात पद क्र. A42001470511 (राष्ट्रसंत तुकडोजी महाराज रस्ते विकास कार्यक्रम (सिमेंट कॉंक्रिटचे रस्ते निर्माण ) अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 385ः—** **{लोककर्म झोन 7}** प्रभाग क्र. २१ (ड) अंतर्गत जुलेखा कॉलेज ते शांतीनगर घाट या परिसरात भुमिगत सिवर लाईनचे काम कामास्तव रु. ४९,८५,१३३/- रकमेच्या प्राकलनास मंजूरी प्रदान करून निविदा मागविण्यास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 386ः—** **{लोककर्म झोन 7}** प्रभाग क्र. २१ (ड) अंतर्गत लालगंज येथील श्रीमती प्रभा पराते, डॉ. शेख, हरिहर डेकोरेशन पासून उत्तम आटा चक्की पर्यंत भुमिगत पाईप लाईन टाकण्याच्या रु.४९,३४,२११/- रकमेच्या प्राकलनास मंजूरी प्रदान करून निविदा मागविण्यास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 387ः—** **{लोककर्म झोन 7}** प्रभाग क्र. २१ (ड) अंतर्गत लालगंज येथील विठ्ठल रूख्मीणी मंदीरा जवळ श्री. धापोडकर ते दर्शना सोमेश्वर यांचे घरापर्यंत भुमिगत पाईप लाईन टाकण्याच्या कामास्तव रु.४९,१३,७६४/- रकमेच्या प्राकलनास मंजूरी प्रदान करून निविदा मागविण्यास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 388ः—** **{लोककर्म झोन ३}** जिल्हा वार्षीक योजना सन २०१८—१९ महाराष्ट्र नगर उत्थान महाअभियान जिल्हास्तर अंतर्गत दक्षिण नागपूर विधानसभा मतदार संघ अंतर्गत एकुण रू. १,९४,०१,६६७/— रकमेचे ४ कामांचा प्रस्तावास प्रशासकिय मंजुरी प्राप्त आहे. या कामाकरीता महाराष्ट्र शासनाचे ५० टक्के अनुदान रू. ९७,००,८३४ व महानगरपालिके ५० टक्के हिस्सा रू. ९७,००८३३/— असे एकुण १,९४,०१,६६७/— या करीता म.न.पा. च्या दक्षिण नागपूर क्षेत्रातील खाली दिलेल्या ४ कामाचा ५० टक्के खर्च करण्याकरीता महासभेची मंजुरी आवशक आहे. करीता सदर प्रस्ताव महासभेपुढे ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली तसेच, म.न.पा. सभागृहाकडे मंजुरीस्तव अग्रेषित करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

| अ. क्र. | कामाचे नांव | प्राकलनिय राशी | ५०% डी.पी.डी.सी. हिस्सा | ५०% म.न.पा. हिस्सा |
|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ३२, बजरंगनगर मैदानाला संरक्षण भिंत बांधणे, वॉकींग ट्रक बनविणे व ईतर कामे (स्थापत्य, उद्यान व विद्युतबाबतची) | ६१,५०,६४०/— | ३०,७५,३२०/— | ३०,७५,३२०/— |
| २ | प्रभाग क्र. ३२ , जुना सुभेदार लेआऊट येथील मैदानात योगा शेड ट्रिनेस साहीत्य वॉकींग ट्रॅक बनविणे, फिटनेस साहित्य | ५३,३०,८७२/— | २६,६५,४३६/— | २६,६५,४३६/— |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | लावणे व ईतर कामे (स्थापत्य, उद्यान व विद्युतबाबतची) | | | |
| ३ | प्रभाग क्र. ३४, सरस्वतीनगर शिवाजी भाडेकरू गृहनिर्माण संस्था ख.क्र. १३/१ येथील मैदानात वॉकींग ट्रक बनविणे व ईतर कामे (स्थापत्य) | २४,९९,१९८/— | १२,४९,५९९/— | १२,४९,५९९/— |
| ४ | प्रभाग क्र. ३१ रमाई गार्डन चंदननगर येथे वॉकींग ट्रॅक व संडासचे बांधकाम करणे (स्थापत्य व विद्युत) | ५४,२०,९५७/— | २७,१०,४७९/— | २७,१०,४७९/— |
| | एकुण राशी | १,९४,०१,६६७/— | ९७,००,८३४/— | ९७,००,८३३/— |

<u>ठराव क्रमांक 389</u>:— प्रभाग क्र. ३४ (क) मधील न्यू अमर नगर येथिल रस्त्याचे रुंदीकरण
{लोककर्म झोन ३} व डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्रप्त एकून सहा निवीदाराशी पैकी मे. प्रेमचंद राचूमल यांची प्राकलणीय दरापेक्षा ४.४९ टक्के कमी दराची प्रथम निम्नतम निवीदा राशी रु. ३८,११,३९७/— रकमेची निवीदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 390</u>:— प्रभाग क्र. ३४ (क) मधील शेषनगर येथे मानेवाडा नाल्याला संरक्षण
{लोककर्म झोन ३} भिंत बांधण्याचे कामास्तव रु.४९,९९,९८७/— च्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याच्या तसेच पद क्र. A४२००१३७४६१२ अंतर्गत मुक्त करून या कामाची रितसर निवीदा बोलाविण्याच्या अनुमतीस्तव प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 391</u>:— प्र.क्र. ३१ (ब) अंतर्गत न्यु रघुजी नगर आणि न्यु सोमवारी क्वॉर्टर
{लोककर्म झोन ३} येथे रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रू. 34,37,338/— च्या प्राकलनास प्र''ाासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तसेच पद क. A22001330802 अंतर्गत मुक्त करून या कामाची रितसर निविदा बोलविण्याचा अनुमतीस्तव प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 392</u>:— प्रभाग क्र. ३६, एल. आय. जी. कॉलनी येथे सिमेंट
{कार्य. अभि.(प्रकल्प)} पेव्हमेंटचे बांधकाम करणे रूपये २५८६२६८/— च्या निविदा राशीचे शासकीय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाचे कामास्तव निविदा मागविल्या असता, प्राप्त निविदा पैकी निम्नतम निविदाकार मे, सचिन टी. साहु यांची प्राकलनिय दरापेक्षा १६.५० टक्के प्रमाणे कमी दराची रूपये २१५९५३४/— निविदा प्राप्त झाली आहे. या कामाची प्र. मा. रक्कम रूपये २९३५४१४/— असुन या कामावर निविदाकाराचा देकार रूपये २१५९५३४/— + १२ टक्के जीएसटी रूपये २५९१४४/— असे एकुण रूपये २४१८६७८/— ची निविदा मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 393</u>:— प्रभाग क्र. ३२—क मधील जवाहरनगर येथील मानेवाडा रोड ते
{लोककर्म झोन ३} आदर्श विद्या मंदीर पर्यंत रस्त्याचे सिमेंटीकरणाचे काम करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण पाच निविदाकाराची निविदांपैकी मे. एन. एन. बेलखुडे यांची प्राक्कलनीय दरापेक्षा १७.४९ टक्के कमी दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. २९,१२,२१५/—च्या रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 394</u>:— प्रभाग क्र. 27 — ब येथिल गुरूदेव नगर व नंदनवन येथिल रस्त्याचे
{लोककर्म झोन ५} रूंदीकरण व डांबरीकरण करण्याचा कामास्तव रूपये 47,47,673/– च्या प्राकलनास प्रशासकिय मान्यता प्रदान करणे व निविदा मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 395</u>:– {स्लम विभाग} प्रभाग क्र. 23 'ड' पडोळेनगर येथे बौध्द विहार ते गीता भवन पर्यन्त सिमेंट कॉक्रिट रोड बांधण्याच्या कामास्तव प्राप्त एकुण 05 निविदापैकी निम्नतम निविदाकार मे. निखील संजय पाटील यांची प्राकलनीय दरापेक्षा 11.70% टक्के कमीवर असलेली रूपये 46,99,212/– (रूपये छेचाळीस लक्ष, नव्यान्नव हजार दोनशे बारा फक्त) ची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच,

या कामाचा खर्च लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत करण्यात येईल. उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 396</u>:– {लोककर्म झोन 7} प्रभाग क्र. २१ (अ) अंतर्गत प्रेम नगर साई नगर महेश नगर नारायणपेठ येथे भुमिगत पावसाळी नालीचे बांधकाम करण्यास्तव रु. ३२,५२,७२०/- रकमेच्या प्राकलनास मंजूरी प्रदान करून निविदा मागविण्यास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 397</u>:– {लोककर्म झोन 7} प्रभाग क्र. ५ (ब) अंतर्गत कांजी हाऊस ते बारानल चौक ते रिंग रोड (राजेश शाहू दुकान) पर्यंत पावसाळी नालीचे बांधकाम करण्यास्तव रु. ४५,४१,४४०/- रकमेच्या प्राकलनास मंजूरी प्रदान करून निविदा मागविण्यास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 398</u>:– प्रभाग क्र. ५ (ब) अंतर्गत दुर्गावती चौक येथील इंदीरा {लोककर्म झोन 7} माता मंदीर ते एन.आय.टी. हॉल ते राणी दुर्गावती चौका पर्यंत सी.सी. पेव्हमेंट रस्त्याची कामे करण्यास्तव रु. ९५,७०,३३८/- रकमेच्या प्राकलनास मंजूरी प्रदान करून निविदा मागविण्यास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 399</u>:– {लोककर्म झोन 7} प्रभाग क्र. ५ (ब) अंतर्गत शांतीनगर मारवाडी वाडी गजानन मंदिर जवळ नाल्याची सुरक्षा भिंतीचे बांधकाम करण्यास्तव रु. ३२,१४,०४९/- रकमेच्या प्राकलनास मंजूरी प्रदान करून निविदा मागविण्यास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 400</u>:– {लोककर्म झोन 7} प्रभाग क्र. ५ (ब) अंतर्गत शांतीनगर मारवाडी वाडी येथे सी.सी. पेव्हमेंट रस्त्याची कामे करण्यास्तव रु. ७७,७१,०५८/- रकमेच्या प्राकलनास मंजूरी प्रदान करून निविदा मागविण्यास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 401</u>:– {लोककर्म झोन ९} प्रभाग क्र. ३ (क) अंतर्गत मॉ बम्लेश्वरी नगर येथील श्री रामदास शिंगारे ते श्री आगासे यांच्या घरापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करण्यास्तव रु. ४९,८६,१९०/- रकमेच्या प्राकलनास मंजूरी प्रदान करून निविदा मागविण्यास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 402</u>:– {लोककर्म झोन १०} प्रभाग क्र. १ मधील नारा घाट येथे सिमेंट रोड, फुटपाथ, शेड व टॉयलेट ब्लॉकचे बांधकाम करण्याकरीता मागविण्यात आलेल्या ई निविदातील एकुण २ प्राप्त निविदापैकी मे. एस. के. ईंटरप्राईजेस यांची मुळ प्राकलनीय राशी पेक्षा ११.२२% कमी दराची राशी रू. ४९,९४,९३५/– ( एकोनपन्नास लक्ष चौऱ्यानऊ हजार नऊशे पस्तीस रूपये फक्त ) रकमेची प्रथम निम्नतम दराची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 403</u>:– {प्रकल्प विभाग} वर्धा रोड ते जयताळा दरम्यान म.न.पा.च्या मालकीच्या जागेवर (डिफेन्स रेल्वेकडून म.न.पा.स हस्तांतरीत जागा) वाणिज्यिक व मिश्रित वापराचा बि. ओ.टी. तत्वावर विकास करण्यास्तव आर्किटेक्ट हफीज कॉन्ट्रॅक्टर यांना प्रकल्पाची प्राकलनिय किंमत किंवा

निविदा किंमत जे कमी असेल त्याचे 3 टक्के शुल्काप्रमाणे प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागार नेमणूक करण्यास स्थायी समिती ठराव 70, दि. 03/09/2011 अन्वये मंजूरी प्राप्त आहे. तसेच याबाबतचे त्यांचेसोबत केलेल्या करारनाम्याचे प्रारूपास स्थायी समिती ठराव क्र. 58, दि. 16/06/2012 अन्वये मंजूरी प्राप्त आहे.

सदर्हु जागेवरील बि.ओ.टी. तत्वावरील प्रकल्प रद्द करून हा प्रकल्प स्वबळावर मनपा व्दारे उभारण्याबाबत व या अंनुषगाने पूर्व प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागार आर्किटेक्ट हफीज कॉन्ट्रॅक्टर यांचा करारनामा सुधारीत करण्याबाबत आवश्यक कारवाहीचे अधिकार आयुक्त, मनपा यांना प्रदान करण्यास सभागृहाचे ठराव क्र. 125 दि. 16.10.2017 अन्वये मंजुरी प्राप्त आहे.

वरील प्रस्तावनेचे अनुषंगाने नागपूर येथे वर्धा रोड ते जयताळा या परिसरातील सलग मनपाच्या मालकीची 30.49 हेक्टर जागेवर वाणिज्यिक व मिश्रित वापराचा ऑरेज सिटी स्ट्रिट प्रकल्प स्वबळावर म.न.पा. तर्फे राबविण्याकरीता पूर्वी मंजूरी प्राप्त प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागार आर्किटेक्ट हफीज कॉन्ट्रॅक्टर यांचेशी करावयाचे सुधारीत करारनामाच्या प्रारूपास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 404:–** सादर करण्यात येते की, मे. यश आउटडोअर्स यांनी बॅनर {जाहिरात विभाग} स्टॅन्डच्या निविदा प्रक्रियेमध्ये सहभाग घेवून सर्वात जास्त रकमेची निविदा सादर केल्यामुळे नियमाप्रमाणे कार्यवाही पुर्ण करुन म.न.पा. आउटडोअर ॲडव्हरटायजींग पॉलीसी २००१ (सुधारीत २०१७) अन्वये स्विकृतीपत्र दि. ०७.०६.२०१८ देण्यात आले. त्यामध्ये भु–भाटक, लायसन्स फी व सुरक्षा ठेव इत्यादी असे एकुण रु. ६९,००,५७३/– जमा करण्याबाबत कळविण्यात आले.

या अनुषंगाने मे. यश आउटडोअर्स यांनी दि. ०२.०६.२०१८ रोजी कार्यालयास कळवून बॅनर स्टॅन्डचे सुधारीत डिजाईन उभारण्याचे प्रस्तावित केले. सुधारीत डिजाईनचे बॅनर स्टॅन्डला लागणारा खर्च (रु. ११,६१,६००/–) दि. ०२.०६.२०१८ चे पत्राव्दारे सुट देण्याबाबत विनंती केली. त्याचप्रमाणे त्यांनी पुनश्च दि. ०७.०६.२०१८ रोजी पत्र देवून प्रत्यक्षात येणारा खर्च रु. २०,४३,८००/– ची सुट मिळण्याबाबत विनंती अर्ज दाखल केला. या अनुषंगाने प्रस्ताव सादर केल्यानंतर मा. अति. आयुक्त यांनी दि. १८.०८.२०१८ रोजी उपायुक्त–१ (महसुल) व सहायक आयुक्त (जाहिरात) यांचेशी प्रत्यक्ष चर्चा करुन मे. यश आउटडोअर्स यांची मागणी फेटाळण्यात यावी व निविदाप्रमाणे पात्र रक्कम ७ दिवसाचे आत भरण्यास यावे, असे सबंधीतांना पत्र द्यावे, असे निर्देश दिले. या अनुषंगाने मे. यश आउटडोअर्स यांना खालील प्रमाणे रक्कम ७ दिवसात जमा करण्याबाबत पत्र देण्यात आले.

| अ. क्र. | विविरण | रक्कम रु. | शेरा |
|---|---|---|---|
| १ | भु–भटक | रु. २८,७५,००१/– | प्रथम तिमाही हप्ता. |
| २ | लायसन्स फी | रु. २,९०,४००/– | प्रथम तिमाही हप्ता. |
| ३ | सुरक्षा ठेव | रु. ३१,६५,४०१/– | वार्षीक भु–भाटक व लायसन्स फीच्या २५%. |
| ४ | वस्तु सेवा कर | रु. ५,६९,७७२/– | तिमाही भु–भाटक व लायसन्स फी च्या १८%. (सुधारीत) |
| एकुण | | रु. ६९,००,५७३/– | |

मे. यश आउटडोअर्स यांनी पुनश्च दि. २८.०८.२०१८ रोजी पत्र देवून १५ दिवसाची मुदत वाढवून देण्याबाबत विनंती केली. तथापी सदर कालावधीमध्ये मे. यश आउटडोअर्स यांनी कोणतीही रक्कम जमा केली नाही. तथापी दि. २२.१०.२०१८ रोजी मा. आयुक्त यांना उद्देशुन पत्र देण्यात आले व खालील रकमेचा भरणा करण्यात आला.

| अ. क्र. | विविरण | धनादेश क्र./दिनांक | रक्कम रु. | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | भु–भटक | ५३४४०८/ १९.१०.२०१८ | रु. ५,६९,७७२/– | प्रथम तिमाही हप्ता. |
| २ | लायसन्स फी | १२९८०९/ | रु. २,९०,४००/– | प्रथम तिमाही हप्ता. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | २०.१०.२०१८ | | |
| ३ | सुरक्षा ठेव | ५३४४०४/ १६.१०.२०१८ | रु. ३१,६५,४०१/— | वार्षीक भु—भाटक व लायसन्स फीच्या २५%. |
| ४ | वस्तु सेवा कर | १२९८०८/ २०.१०.२०१८ | रु. ५,६९,७७२/— | तिमाही भु—भाटक व लायसन्स फी च्या १८%. |
| **एकुण** | | | रु. ६९,००,५७३/— | |

या अनुषंगाने कार्यालयातर्फे खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

१. मे. यश आउटडोअर्स यांनी निविदेतील अटी व शर्ती प्रमाणे भु—भाटक, लायसन्स फी व सुरक्षा ठेव इत्यादी रक्कम स्विकृतीपत्र दिल्यानंतर १५ दिवसाचे आत भरणे अपेक्षीत होते.
२. मे. यश आउटडोअर्स यांनी ४ महिन्याचा कालावधी उशीर केलेला आहे.
३. मे.यश आउटडोअर्स यांनी निविदा प्रक्रिया पुर्ण करण्याकरीता ई.एम.डी. रक्कम रु. ३,५०,०००/— चा भरणा केलेला आहे.
४. निविदा प्रत्रातील पान क्र. ३ वरील NOTICE INVITING TENDER (NIT) मधील अ.क्र. ९ मध्ये निविदेचा ग्राह्य कालावधी सहा महिन्याचा नमुद केला आहे.
५. निविदा प्रत्रातील पान क्र. १९ वरील GENERAL CONDITIONS OF CONTRACT मधील अटी प्रमाणे बॅनरमध्ये कोणत्याही प्रकारची सुधारणा किंबहुना बदल करावयाचे असल्यास अ.क्र. १५.०३ प्रमाणे मा. आयुक्त यांना अधिकार आहेत.
६. त्याच प्रमाणे निविदा प्रत्रातील पान क्र. २३ वरील GENERAL CONDITIONS OF CONTRACT मधील अ.क्र. २९.५ प्रमाणे अर्जदाराने तांत्रीक कारणावरुन केलेला अर्ज व अर्जात कळविलेल्या ईतर बाबी प्रमाणे अंतीम निर्णय घेण्याचे अधिकार म.न.पा. चे आहेत. या अनुषंगाने सदर प्रकरणाला अंतीम निर्णय घेण्यास्तव मा. स्थायी समिती यांचेकडे ठेवण्यास्तव मा. आयुक्त यांनी मान्यता प्रदान केलेली आहे.

प्राप्त झालेले धनादेश स्विकृत करुन कार्यादेश निर्गमित करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन कार्यालयाने सादर केलेल्या प्रस्ताव एकमताने मंजूर तसेच निविदाकार M/s Yash outdoors यांनी दि. 26/11/2018 च्या विनंती अर्जात जो प्रस्ताव सादर केलेला आहे त्यात Innovitive Banner Stands (IBS 6' X 6') with photo framing concept. हे बॅनर स्टॅंड शहराच्या सौंदर्यीत भर टाकणारे व टिकाऊ आहे असे या स्थायी समितीस वाटते त्यामुळे यामध्ये निविदाकारास काय सुट देता येऊ शकते याची शक्यता तपासून तसा नवीन प्रस्ताव स्थायी समिती समोर विभागाने 15 दिवसाचे आत वरील प्रस्तावाचे कार्यान्विकरण झाल्यापासून सादर करावा यांस स्थायी समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली

**<u>ठराव क्रमांक 405:—</u>**
**{कार्य. अभि.(प्रकल्प)}**
प्रभाग क्र. १६, उज्वल नगर परिसरातील रस्त्याचे बांधकाम व डांबरीकरण करणे रूपये ७२९४९६९/— च्या निविदा राशीचे शासकीय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाचे कामास्तव निविदा मागविल्या असता, प्राप्त निविदा पैकी निम्नतम निविदाकार मे, डी. सी. गुरूबक्षाणी यांची प्राकलनिय दरापेक्षा १.२५ टक्के प्रमाणे कमी दराच रूपये ७२०३७८१/— निविदा प्राप्त झाली आहे. या कामाची प्र. मा. रक्कम रूपये ८२७९७९०/— असुन या कामावर निविदाकाराचा देकार रूपये ७२०३७८१/— + १२ टक्के जीएसटी रूपये ८६४४५४/— असे एकुण रूपये ८०६८२३५/— ची निविदा मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 406:—</u>**
**{लोककर्म झोन 7}**
प्रभाग क्र. २१ (ड) लालगंज चकना चौक बाहुली विहीर गुजरी चौक कुंभारपुरा येथे सि.सि. रोडचे बांधकाम कामास्तव रु. ४६,०४,७९८/- रकमेच्या प्राकलनास मंजूरी प्रदान करून निविदा मागविण्यास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 407:—</u>**
**{लोककर्म झोन ८}**
प्रभाग क्र. 23 (क) अंतर्गत दत्त नगर येथे श्री जुनघरे ते श्री चिरखारे यांचे घरापर्यंत सिमेंट रस्त्याचे बांधकाम करण्यास्तव रु. 40,53,545/— राशीचे प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न तसेच,

सदर कामास मा. अध्यक्ष स्थायी समीती यांनी पद क्र. A42001470511 मधून आर्थिक वर्ष 2018–19 मध्ये रु. 40,53,550/– राशीची तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 408:–** {कार्य. अभि.(प्रकल्प)} प्रभाग क्र. ३८, आंनदनगर ते जयताळा रोड नाला येथे नाल्याची भिंत उभारणे या कामाकरीता रूपये ३५७९५०१/– च्या निविदा राशीचे शासकीय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाचे कामास्तव निविदा मागविल्या असता, प्राप्त निविदा पैकी निम्नतम निविदाकार मे, दिप कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनिय दरापेक्षा १६.११ टक्के प्रमाणे कमी दराची रूपये ३००२८४३/– निविदा प्राप्त झाली आहे. या कामाची प्र. मा. रक्कम रूपये ४०६२७३४/– असुन या कामावर निविदाकाराचा देकार रूपये ३००२८४३/– + १२ टक्के जीएसटी रूपये ३६०३४१/– असे एकुण रूपये ३३६३१८४/– ची निविदा मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 409:–** {सा.प्र.वि.} नागपूर मनपाचे विविध विभाग व क्षेत्रीय कार्यालयामध्ये खाजगी एजेन्सीमार्फत महा ई–निविदाव्दारे कंत्राटी तत्वावर शासनाच्या किमान वेतन दरानुसार सुरक्षा रक्षकांची सेवा घेण्यास स्थायी समिती ठराव क्र. 126, दि. 04.08.2017 अन्वये एक वर्षाचे कालावधीकरीता 1) सुपर सिक्युरीटी सर्विसेस, नागपूर 2) इन्डस्ट्रीयल सिक्युरीटी सर्विसेस, नागपूर 3) किशोर एजन्सीज, नागपूर 4) युनिटी सिक्युरीटी फोर्स ॲन्ड ट्रेनिंग इन्स्टीटयुट, नागपूर या चार पात्र एजेन्सींना मनपाचे करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार दि. 04.01.2018 पासून दि. 31.12.2018 पर्यतचे कालावधीकरीता सुरक्षा रक्षकांची सेवा घेण्याचा कंत्राट देण्यात आला होता.

मनपामध्ये कार्यरत एजेन्सींना मनपाचे करारनाम्यातील अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक असतांना चार एजेन्सीपैकी इन्डस्ट्रीयल सिक्युरीटी सर्विसेस, नागपूर यांनी सुरक्षा रक्षकांना किमान वेतन दरानुसार वेतन देणे व धनादेशाव्दारे/ई–क्लिअरींगव्दारे (RTGS) वेतन देणे बंधनकारक असतांना त्यांनी न दिल्याने अट क्र.15 चे उल्लंघन केलेले आहे. व किशोर एजेन्सीज, नागपूर यांनी मनपाचे अटी व शर्तीतील अट क्र.17 अन्वये कार्यादेशाचे कालावधीपर्यतचे सुरक्षा रक्षक पूरविण्याचे लेबर लायसंन्स मुदतवाढीसह सादर करणे अनिवार्य असतांना कार्यालयास सादर केले नसल्याने अट क्र.17 चे उल्लंघन केले आहे. करीता मा.आयुक्त यांनी या दोन एजेन्सीच्या कंत्राट रद्द करण्यास मंजूरी प्रदान केली आहे. कामगार विभागाचे शासन निर्णय क्र. एस.जी.ए–1506/प्र.क्र.92/काम–5, मंत्रालय, मुंबई, दि. 08 नोव्हेंबर 2006 अन्वये नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाकडूनच सुरक्षा रक्षक घेणे बंधनकारक असल्याने व दि. 12.11.2012 चे अधिसूचनेनुसार नागपूर जिल्हयामध्ये सुरक्षा रक्षक पूरविण्याचे लेबर लायसंन्स देणे बंद केल्याने तसेच खाजगी सुरक्षा एजेन्सीबाबत मा.सदस्य, पदाधिकारी व इतर यांच्या तक्रारी लक्षात घेता विहीत नमुन्यात नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाकडे अर्ज करून नागपूर मनपास पंजीबध्द होणे आवश्यक आहे. करीता नागपूर मनपास नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाकडे पंजीबध्द होणेस प्रस्ताव मा. स्थायी समितीपूढे ठेवण्यात येत आहे.

1) नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, नागपूर यांचे मार्फत सुरक्षा रक्षकांची सेवा घेण्यास मंडळाकडे नागपूर महानगर पालिकेला मंडळाकडे पंजीबध्द होणेबाबत/नोंदणी करण्यास मान्यता प्रदान करणे.

2) इन्डस्ट्रीयल सिक्युरीटी सर्विसेस, नागपूर अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यामुळे यांचा कंत्राट रद्द करून यांचे नाव काळया यादीमध्ये टाकणे व किशोर एजन्सीज, नागपूर यांनी अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यामुळे यांचा कंत्राट रद्द करून मनपाला नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाकडे पंजीबध्द होवून मंडळाचे सुरक्षा रक्षकांची सेवा प्राप्त होईपर्यत कंत्राट रद्द करण्यात आलेल्या दोन्ही एजेन्सीचे कार्यरत असलेल्या सुरक्षा रक्षकांची स्थळे सध्या मनपामध्ये कार्यरत असलेल्या सुपर सिक्युरीटी सर्विसेस, नागपूर व युनिटी सिक्युरीटी फोर्स ॲन्ड ट्रेनिंग इन्स्टीटयुट, नागपूर या एजेन्सीकडून सेवा घेणेबाबत मान्यता प्रदान करणे.

3) नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाचे प्राप्त नविन दरानुसार प्रतिदिन दर रू. 662.84/– प्रमाणे प्रतिमाह प्रति सुरक्षा रक्षक दर रू. 20161.38/– प्रमाणे एकुण 289 सुरक्षा रक्षकांवर प्रति माह रू. 58,26,638.82/– अपेक्षीत असून वार्षीक खर्च रू. 6,99,19,665.84/– होणे अपेक्षीत आहे. तसेच या सुरक्षा

रक्षकांवर नियंत्रण ठेवणेस सुरक्षा पर्यवेक्षकांची नियुक्ती आवश्यक असल्याने प्रती पर्यवेक्षक प्रती माह दर रू. 21906.69/— प्रमाणे वार्षीक खर्च रू. 2,62,880.28/— होणे अपेक्षीत असून 12 पर्यवेक्षकावरील वार्षीक खर्च रू. 31,54,563.36/— होणे अपेक्षीत आहे. (खाजगी सुरक्षा रक्षक एजेन्सीचे नविन दर रू. 19236.75 असून एजेन्सीमार्फत पर्यवेक्षकाची सेवा देण्यात येते) कंत्राटाची मुदत दि. 31.12.2018 ला संपूष्टात येत असल्याने दि. 01.01.2019 पासून नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाकडून सुरक्षा रक्षकांची सेवा घेण्यास उपरोक्त प्रमाणे मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

1. स्थायी समिती ठराव क्र. 126 दि. 4/8/2017 प्रमाणे जो निर्णय झाला आहे तो कायम ठेवण्यात येतो. विभागाद्वारे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावास एकमताने नामंजूरी प्रदान करण्यात येते.
2. इंडस्ट्रीयल सिक्युरीटी सर्विसेस यांचे कंत्राट रद्द करण्यास एकमताने मंजूरी प्रदान करण्यात येते आणखी असे की, किशोर एजन्सीज, नागपूर यांचे ज्या कारणास्तव कंत्राट रद्द करण्याचा प्रस्ताव विभागाने सादर केला आहे. त्याबाबत दि. 12/11/2012 च्या अधिसुचनेद्वारे नागपूर जिल्हयाकरिता तसेच विदर्भातील इतर जिल्हयाकरिता लागू करण्यात आल्यामुळे नागपूर जिल्हयातील अथवा विदर्भातील कोणत्याही जिल्हयात सुरक्षा रक्षक पुरविण्याच्या कामाकरिता कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) अधिनियम, 1970 अंतर्गत अनुज्ञप्ती देण्यात येत नाही असे पत्र सहा. कामगार आयुक्त अनुज्ञप्ती अधिकारी यांचे कडून किशोर एजन्सीला दि. 22/08/2017 ला प्राप्त झाले आहे याची विभागाने नोंद घेतली नाही असे दिसुन येते त्यामुळे निविदाकार हा रितसर निविदाप्रक्रियेतून पात्र असल्यामुळे त्यांचे कंत्राट रद्द करणे न्यायोचित होणार नाही. त्यामुळे किशोर एजन्सी यांचे कंत्राट रद्द करण्यास एकमताने नामंजूरी प्रदान करण्यात येते. आणखी असे की, इंडस्ट्रीयल सिक्युरीटी सर्विसेस यांचे कंत्राट रद्द केल्यामुळे त्यांचेकडे असणारे कामाची व सुरक्षा रक्षकांची स्थळे खालील तीन एजन्सी (1) सुपर सिक्युटीरी सर्विसेस, (2) युनिटी सिक्युरीटी फोर्स अॅन्ड ट्रेनिंग इन्स्टीटयुट, नागपूर, (3) किशोर एजन्सी, नागपूर यांना समप्रमाणात द्यावे यास एकमताने मंजूरी प्रदान करण्यात येते.
3. प्रस्तावित विषयातील कंत्राटाची मुदत दि. 31/12/2018 ला संपुष्टात येत असल्यामुळे दि. 01/01/2019 पासून एक वर्षाकरिता (1) सुपर सिक्युटीरी सर्विसेस, (2) युनिटी सिक्युरीटी फोर्स अॅन्ड ट्रेनिंग इन्स्टीटयुट, नागपूर, (3) किशोर एजन्सी, नागपूर यांना देण्यात आलेल्या कंत्राटास मुदतवाढ देण्यात येते व यावरील येणाऱ्या वार्षिक खर्चास एकमताने मंजूरी प्रदान करण्यात येते.

<u>ठराव क्रमांक 410:—</u> {कार्य. अभि.(प्रकल्प)} प्रभाग क्र. ३६, चंदनखेडे चक्की ते जयप्रकाशनगर येथील रोडचे डांबरीकरण व आय ब्लॉक लावणे या कामाकरीता रूपये ३२६९९३०/— च्या निविदा राशीचे शासकीय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाचे कामास्तव निविदा मागविल्या असता, प्राप्त निविदापैकी निम्नतम निविदाकार मे. अमृत कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनिय दरापेक्षा १०.०० टक्के प्रमाणे कमी दराची रूपये २९४२९७०/— निविदा प्राप्त झाली आहे. या कामाची प्रशासकीय मान्यता रक्कम रूपये ३७११३७१ /— असुन या कामावर निविदाकारांचा देकार रूपये २९४२९७०/—, १२ टक्के जी.एस.टी. (G.S.T.) रूपये ३५३१५६ /— असे एकुण रूपये ३२९६१२६ /— ची निविदा मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 411:—</u> {लोककर्म झोन ८} प्रभाग क्र. 23 (क) अंतर्गत गरोबा मैदान येथे श्री मोहने ते श्री थुल व श्री जुमडे ते श्री गराडे यांचे घरापर्यंत सिमेंट रस्त्याचे बांधकाम करण्यास्तव रु. 45,07,132/— राशीचे प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न तसेच,

सदर कामास मा. अध्यक्ष स्थायी समीती यांनी पद क्र. A42001470511 मधून आर्थिक वर्ष 2018—19 मध्ये रु. 45,07,140/— राशीची तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली आहे. उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 412ः—** प्रभाग क्र. ३४ (ड) मधील मानेवाडा वसाहती लगत मानेवाडा
**{लोककर्म झोन ३}** नाल्याला संरक्षण भिंत बांधण्याच्या कामास्तव रु. ६२,४८,७७३/— च्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याच्या तसेच पद क्र. A४२००१३७४६१२ अंतर्गत मुक्त करून या कामाची रितसर निवीदा बोलाविण्याच्या अनुमतीस्तव प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 413ः—** प्रभाग क्र. १७ क अंतर्गत वंजारी नगर श्री. शेंडे ते श्री. भोसले यांचे
**{लोककर्म झोन ४}** घरापर्यंत रोडचे सिमेंटीकरण करण्याचे कामास्तव विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या रु. ३६४१४२१/— रकमेच्या प्राकलनस प्रशासकीय मंजुरी प्रदान करुन निविदा काढण्याचा व या आर्थिक वर्षात पद क्र. ए४२००१४७०५११ (राष्ट्रसंत तुकडोजी महाराज रस्ते विकास कार्यक्रत सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते निर्माण) अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 414ः—** प्र.क्र. ३१ (क) अंतर्गत गणेश नगर (संगम टॉकीज ते महिला
**{लोककर्म झोन ३}** महाविद्यालय ते श्री वंजारी यांचे घरापर्यंत आणि विविध ठिकाणी नव्याने सिव्हर लाईन टाकण्याचे कामास्तव रू. 70,58,847/— च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तसेच पद क. A43901371913 अंतर्गत मुक्त करून या कामाची रितसर निविदा बोलविण्याचा अनुमतीस्तव प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 415ः—** रेशिमबाग स्थित कविवर्य सुरेश भट सभागृहाचे दैनंदिन
**{शहर अभियंता}** रखरखाव, सुरक्षा व्यवस्था, विद्युत उपकरणाचे संचालन,ध्वनी व्यवस्थेचे संचालन इत्यादी तत्सम कामांकरिता स्थायी समिती ठराव क्र. ५९६ दिनांक २८.०२.२०१८ अन्वये रू. १३,५०,०००/— प्रति माह प्रमाणे काम करण्याकरिता नियुक्त निविदाकार मे. स्पिक ॲन्ड स्पॅन सर्व्हीसेस यांची मुदत नोव्हेंबर, २०१८ ला संपुष्टात येत आहे.

सभागृहाकरिता म.न.पा. व्दारा दरमाह होणारा सुस्थिती वरील खर्च कमी होण्याच्या दृष्टीने उपरोलिखीत व्यवस्थे व्यतिरिक्त अस्तित्वातील Cafetoria, Parking व्यवस्थेच्या संचालना बाबतची बाब अंतर्भूत करून नव्याने एकत्रित निविदा मागविण्यास्तव खालील प्रमाणे मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

१. निविदा प्रक्रिया करण्यास्तव अंदाजित एक महिन्याचा कालावधी अपेक्षित असल्याने मंजुर निविदादरावर मे. स्पिक ॲन्ड स्पॅन सर्व्हीसेस, यांना एक महिन्याकरिता मुदतवाढ देण्यास व त्याकरिता येणा—या खर्चास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन नविन निविदा प्रक्रिया पूर्ण होई पर्यंत जुन्या निविदाकारास मुदतवाढ व त्याकरीता येणाऱ्या खर्चास मंजूरी प्रदान करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली
२. कविवर्य सुरेश भट सभागृहाचे दैनंदिन रखरखाव, सुरक्षा व्यवस्था, विद्युत उपकरणाचे संचालन,ध्वनी व्यवस्थेचे संचालन, Cafetoria, Parking इत्यादी तत्सम कामांकरिता तीन वर्षांचा कालावधीकरिता एकत्रित निविदा मागविण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 416ः—** प्रभाग क्र. 8 'ड' येथे गोलीबार चौक ते मोमीनपूरा चौक ते
**{लोककर्म झोन ६}** मोतीबाग रेल्वे ब्रिज पर्यन्त रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव तयार केलेल्यारू. 12434112/— रकमेच्या प्राकलनास पद क्र. A22001330801 (370) अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 417ः—** महानगरपालिका तथा नागपूर जिल्हा हौशी धनुर्विद्या संघटना
**{क्रीडा व सांस्कृ.}** यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर शहरात ''राष्ट्रीय धनुर्विद्या स्पर्धा व धनुर्विद्या महोत्सव'' दि. १०.११.२०१८ ते दि. १४.११.२०१८ कालावधीत संपन्न झाला. या स्पर्धामध्ये म.न.पा. तर्फे T-4 वरील A अन्वये खर्चास मा. आयुक्त यांनी सहमती दर्शविलेली आहे.

दि. ०७.११.२०१८ ते दि. ११.११.२०१८ पर्यंत शासकीय सुट्टया असल्यामुळे नस्ती दि. १३.११.२०१८ रोजी कार्यालयाकडे प्राप्त झाली. स्पर्धा दि. ११.११.२०१८ ते १३.११.२०१८ पर्यंत संपन्न झाली. या स्पर्धा म.न.पा. च्या संयुक्त विद्यमाने असल्यामुळे मा. सभापती, क्रीडा समिती यांनी संघटनेशी चर्चा करवुन व वेळ कमी असल्यामुळे शासकीय सुट्टया आल्यामुळे येणाऱ्या खंळाडूंची गैरसोय होऊ नये तथा म.न.पा. च्या प्रतिष्ठेचा विचार करवुन भोजन व्यवस्था या अगोद ''महापौर चषक'' महिला बॉक्सिंग स्पर्धा मध्ये ज्या कॅटरर्स ने व्यवस्था केलेली होती त्यांचेकडुन शासकीय दरान्वये करवुन घेऊन तथा मंडप डेकोरेशन व्यवस्था संघटनेचे नेहमी कार्य करणाऱ्या फर्म मे. डागा टेन्ट हाऊस तथा लोकल खेळाडु वाहतूक मे. जय गजानन ट्रॅव्हल्स व निवास व्यवस्था मे. महाकाळकर सभागृह यांचेकडुन व्यवस्था करवुन घेतली व तसे पत्र त्यांनी दिलेले असून त्यांना भुगतान करण्याबाबत विनंती पत्र दिलेले आहे. उपरोक्त फर्म चे देयक खालील प्रमाणे विभागाकडे सादर केलेले आहे.

1) मे जगदंबा कॅटरर्स — रु. 14,61,500/—
2) मे. महाकाळकर सभागृह — रु. 2,40,000/—
3) मे. जय गजानन ट्रॅव्हल्स — रु. 2,40,000/—
4) मे. डागा टेन्ट हाऊस — रु. 10,00,000/—

याकरिता मा. आयुक्त महोदय यांनी T-4 वरील A नुसार रु. २९,९०,०००/— खर्चास सहमती दर्शविलेली असून स्थायी समितीकडे सादर करण्याचे निर्देश दिलेले आहे. त्याप्रमाणे उपरोक्त फर्मला भुगतान करण्याकरिता स्थायी समितीकडे कार्योत्तर मंजुरीकरिता सादर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 418:—</u>
{लोककर्म झोन ३}

प्र.क्र. ३१ (क) अंतर्गत शिवनगर श्री सावरबांधे यांचे घराजवळ सिमेंट कांक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्याच्या कामास्तव रू. 1,24,84,829/— च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तसेच पद क्. A42001470511 अंतर्गत मुक्त करून या कामाची रितसर निविदा बोलविण्याचा अनुमतीस्तव प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 419:—</u>
{समाजकल्याण विभाग}

स्थायी समिती ठराव क्र. 118, दिनांक 05/06/2018 मधील अटी व शर्तीनुसार ''अंत्योदय योजना'' अंतर्गत दिव्यागांना ई—रिक्षा वाटप करण्याकरिता विभागामार्फत पात्र ठरविण्यात आलेल्या 68 लाभार्थ्यांची यादी स्थायी समितीसमोर माहितीकरिता ठेवण्याचा तसेच उर्वरित सन 2017—18, 2018—19 मधील लाभार्थी ज्यांना ई—रिक्षाची अत्यंत आवश्यक आहे अश्या लाभार्थ्यांची निवड महिला व बाल कल्याण समितीच्या माध्यमातुन करण्याचे अधिकार देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 420:—</u>
{लोककर्म झोन ५}

प्रभाग क्र. २६ अ अंतर्गत न्यु सुरजनगर भागात पावसाळी पाण्याची R.C.C (N P III) पाईप लाईन चे काम करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण तिन निविदाकाराची निविदांपैकी मे. आर बी यादव यांची मुळ प्राक्कलनीय दरापेक्षा 5.60% प्रतिशत कमी दराची रू. 29,85,176/— रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 421:—</u>
{क्रीडा व सांस्कृ.}

महानगरपालिका नागपूर तथा कोशु कुंग फु स्पोर्ट असो. महाराष्ट्र नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर शहरात “महापौर चषक” कराटे व कोशु—कुंग—फु राष्ट्रीय स्पर्धाचे आयोजन करण्यात येणार आहे. या स्पर्धा आयोजनास्तव रू. ११,०५,०००/— खर्च अपेक्षित असुन हा खर्च आवेदन, निविदा, अग्रीम स्वरूपात करावयाचा असुन हा खर्च पद क्र.A 26502242211 मधुन मा. अध्यक्ष स्थायी समिती यांचे राखीव तरतुद मधुन प्राप्त नुसार करण्यात येईल तसेच,

करीता उपरोक्त प्रस्तावास वित्तिय तथा प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रश्न विचारात घेण्यास्तव स्थायी समितीकडे सादर केलेला प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 422ः—** {लोककर्म झोन ३} प्रभाग क्र. ३२ (क) लाडीकर ले आऊट मधील मानेवाडा रोड ते अंबीका नगर नाल्यापर्यंत सिमेंट रस्त्याचे निर्माण करण्याच्या कामास्तव रु. ५३,५३,८८६/— च्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याच्या तसेच पद क्र. A22001330802 अंतर्गत राशी मुक्त करून या कामाची रितसर निवीदा बोलाविण्याच्या अनुमतीस्तव प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 423ः—** {लोककर्म झोन ८} प्रभाग क्र. २५—अ, अंतर्गत श्री. धनश्याम ठेंगे यांचे घरापासून ते हिंगे किराणा ठवकरवाडी पारडी येथे सिमेंट कांक्रीट रोडचे बांधकाम करण्यास्तव रू. ४८,३८,५३२/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा तसेच पद क्र. ए ४२००१४७०५११ मधून तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 424ः—** {लोककर्म झोन ८} प्रभाग क्र. २५—क, अंतर्गत घटाटे नगर येथील विविध रस्त्यावर डांबरीकरण करण्यास्तव रू. ४९,२३,२९९/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा तसेच पद क्र. ए ४२००१३३०८०२ मधून तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 425ः—** {लोककर्म झोन ८} प्रभाग क्र. २५—क, अंतर्गत शिवनगर पूनापूर येथील विविध रस्त्यांचे डांबरीकरण करण्यास्तव रू. ४९,८२,८८६/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा तसेच पद क्र. ए 42001374612 मधून तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 426ः—** {लोककर्म झोन ८} प्रभाग क्र. २५—ड, भरतवाडा रोड ते शुभलक्ष्मी इंटरप्राइजेस, राम मंदीर, भवानी नगर येथील रस्त्यांचे डांबरीकरण करण्यास्तव रू. ३८,९०,८२४/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा तसेच पद क्र. ए 42001374612 मधून तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 427ः—** {लोककर्म झोन ८} प्रभाग क्र. २५—ड, अंतर्गत गंगाबाग, पारडी येथे विविध ठिकाणी रस्त्यांचे डांबरीकरण करण्यास्तव रू. ४८,७३,१०९/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा तसेच पद क्र. ए 42001374612 मधून तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 428ः—** {लोककर्म झोन ८} प्रभाग क्र. २५—क, अंतर्गत श्याम नगर आणि नविन नगर येथील रस्त्यांचे डांबरीकरण करण्यास्तव रू. ४९,२४,७१०/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा तसेच पद क्र. ए 22001330802 मधून तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

श्री.मनोज सांगोळे :— मा.सभापती महोदय, नागपूर सुधार प्रन्यास बरखास्त नही हो रही है। उनके कार्यक्षेत्र मे जो ५९२ अभिन्यास तळेगाव दाभाडे स्कीम अंतर्गत जो भाग है वहापर काम नही हो रहे उनके पास मे जो पेडींग काम पडे है वह अपने पास लिये जायें। वहा के नागरिक अपने प्लॉट रेगुलर करना चाहते है। अपने यहा ३/३ ट्रस्टी एन.आय.टी.मे है एक मा.आयुक्त साहेब, मा.सभापती स्थायी समिती और एक मा.नगरसेवक जब तक एन.आय.टी. डिझॉल नही होती उन क्षेत्र मे विकास काम नही होंगे। इसलिये वह भाग म.न.पा. के अंडर मे लिया जायें।

सभापती :— एन.आय.टी. मे काम नही हो रहे है ऐसा बिलकुल नही है। मुदगल साहब के अंडर मे काफी बडे पैमाने में एन.आय.टी मे काम हो रहे है। जिन लेआउट मे ओपन ग्राउंड, पी.यु. लॅन्ड है वह लेआउट सॅग्शन नही हो सकते उसके संदर्भ मे सुप्रीम कोर्ट के गाईड लाईन्स है। और जो लेआउट सॅग्शन हो सकते है आप उन लेआउट की कॉपी मुझे दे देजिये मै उस संदर्भ वहा चर्चा करुंगा। टॅक्स के रेव्हेन्यु के संदर्भ मे पिछली सभा में विभाग को निर्देश दिये गये थे। आज देखने मे यह आ रहा है की मा.सदस्य के प्रभाग मे विकास काम नही हो रहे है। ठेकेदारों को पेमेंट

नही मिल रहा है। मा.सदस्यों के प्रभाग के विकास के फाईल छोटे छोटे कारण देकर महानगरपालिका की आर्थिक स्थिती बतातें हुये रोक दि जाती है यह ठिक नही है। जहा अडचण है, रोड अच्छे है उसके संदर्भ में अगर किसीने प्रपोज किया है तो वह रोक सकते है। लेकीन जहा नाले की अडचण है ऐंसे काम नही रोकने चाहियें। मा.महापौरजी के दौरे के दरम्यान कई जगह नालों की दिवाल बनाने के आवश्यकता सामने आयी है। ऐसें कामों को तुरंत प्रोव्हीजन देना चाहिये। मा.सदस्य अपनी फाईल लेकर अधिकारीयों के पास जा रहे है लैकीन उनके फाईलों पर कोई भी निर्णय नही लिया जा रहा है।

श्री.मनोज सांगोळे :— मा.सभापती महोदय, झोन वाईज एच.ओ.डी. को बिस लाख रुपये के अधिकार दिये गये थे उसके उपर वह लोग काम नही कर सकते। वह आदेश तुरंत रद्य होने चाहिये।

सभापती :— वह आदेश तुरंत रद्य किये जायें।

श्री.सुनिल हिरणवार :— मा.सभापती महोदय, बोरींग के विषय के संदर्भ मे जानकारी दिजायें।

श्री.गणवीर (उपअभियंता, जलप्रदाय) :— मा.सभापती महोदय, बोरींग के कामों के संदर्भ मे पिछले साल टेंडर हुये थे, चार ठेकेदारों मे से दो ठेकेदार वही रेट पर काम करने के लिये तयार है।

सभापती :— ३४७ बोरींग लगाने के कामों के संदर्भ में तुरंत काम शुरु किये जायें। जहॉ बोरींग लगाने मे अडचण है वह काम प्रलंबित रखते हुये जो साईड क्लीअर है वहा तंरुत बोरींग लगवाये जायें। मा.सदस्यों के प्रभाग मे ५ बोरींग ॲडजस्ट किये जायें। टॅक्स के रिकव्हरी के संदर्भ में जानकारी दि जायें।

सहा.आयुक्त कर व कर आकारणी विभाग (श्री.मेश्राम) :— मा.सभापती महोदय, मालमत्ता कर विभागाच्या उत्पन्नाच्या संदर्भात आतापर्यत ११५.५३ कोटी रुपये प्राप्त झाले आहे. मागच्या वर्षी या पिरेडमध्ये ९३.१८ लाख रुपये प्राप्त झाले होते. यावेळेस २२.१८ कोटी रुपयांनी वाढ झालेली आहे. डाटा कलेक्ट करुन नागरिकांना डिमांड पाठविण्यात येत आहे.

सभापती :— टॅक्स वसुली के संदर्भ मे पिछली सभा मे और हाउस मे लगातार चर्चा हो रही है। पिछले साल हम २५ कोटी से आगें थे और आज २२ कोटी से आगे है । जिस तरीके से कलेक्शन होना चाहिये देखने मे आ रहा है की उस तरीके से काम नही हो रहे है। नोव्हेबर समाप्त हो गया है। और इन ८ महिने मे केवल ११५ कोटी रुपये टॅक्स वसुली के संदर्भ मे प्राप्त हुये है। इसके लिये झोन वाईज आढावा लेना पडेंगा। बिल जनरेट करने पडेंगे। पिछले बार हाउस की सभा में इस विषय पे चर्चा हुयी थी अगर हम लास्ट इअर का अपवाद मानकर इसको इगनोर करेंगे तो टॅक्स वसुली मे काफी पिछे रह जायेंगें। सहा.आयुक्त इस और ध्यान नही दे रहे है। एक—एक पोर्टफोलियोपर हमे चर्चा करनी पडेंगी। सिरीअस होना पडेंगा। पिछली बार में बताया गया था की १५ दिन मे ४५ करोड रुपयों का टारगेट पुरा किया जायेंगा लेकीन ऐंसा नही हो रहा है।

अपर आयुक्त (श्री.ठाकरे) :— मा.सभापती महोदय, ही परिस्थिती बदलण्यासाठी विभागाचे प्रयत्न सुरु आहे. प्रत्येक झोनमध्ये जावुन याचा आढावा सुध्दा घेण्यात आला होता. प्रत्येक झोनमध्ये ऑक्शनची लिस्ट तयार करण्यात आली होती. ऑक्शनसाठी जाहिरनामा काढवा लागतो त्याला ३० दिवसाचा पिरेड दयावा लागतो ही कारवाई सुध्दा विभागाकडुन करण्यात येईल.

सभापती :— टॅक्स वसुली के संदर्भ मे विभाग को सिरीअस होना पडेंगा। ऑक्शन की कारवाई जोरोशोरो से करनी पडेगी। पेपर मे जाहिरात देकर ऐंसे केसेस की और विशेष ध्यान देना पडेंगा। अगर हम २५,००० वाले केसेस तुरंत ध्यान देकर निकालते है तो काफी मात्रा मे टॅक्स की वसुली बढ सकती है। इस ओर विभाग ने ध्यान देना चाहियें। और सहा.आयुक्त ने इस ओर विशेष ध्यान देना चाहियें।

श्री.मनोज सांगोळे :— मा.सभापती महोदय, आशीनगर झोनमध्ये नेहमी सर्व्हर डाउन राहते नागरिक त्या ठिकाणी टॅक्स भरण्यासाठी येतात परंतु सर्व्हर डाउन असल्यामुळे त्यांना परत जावे लागत आहे.

सहा.आयुक्त कर व कर आकारणी विभाग (श्री.मेश्राम) :— मा.सभापती महोदय, सर्व्हर डाउनच्या संदर्भात कोणतीही तक्रार विभागाला प्राप्त झालेली नाही. नागपूर शहरात जेवढया इमारती

आहे त्याचा जी.आय.एस. बेस डाटा डिसेंबर पर्यत आल्यानंतर आपण त्याचा युजर आय.डी. उपलब्ध करुन देवु व ही पध्दत सुचारु पध्दतीने काम करेल.

सभापती :— टॅक्स वुसली के संदर्भ मे अभीतक केवल ११५ कोटी रुपये प्राप्त हुये है। मुझे १४० कोटी के आसपास पोहचने की उम्मीद थी। ऐसा लग रहा है की सहा.आयुक्त इस विषय मे गंभीर नही है। १० झोन के सहा.आयुक्त को शो—कॉज नोटीस देकर स्पष्टीकरण मॉगा जायें और सिरीअस रहकर यह कारवाई की जायें। उसी तरह से तारीख ३.१२.२०१८ से मा.पालकमंत्री महोदय का झोन वाईज जनता दरबार शुरु हो रहा है। झोन के सहा.आयुक्त ने इस संदर्भ में सुचारु पध्दतीसे सारी व्यवस्था झोन मे करनी चाहिये। झोन मे जो तक्रार प्राप्त हो रही है उसका निपटारा समाधान पुर्वक करना चाहिये। पालकमंत्रीजी के जनता दरबार के दरम्यान पुअर शो नही दिखना चाहियें। जिस तरीके की तक्रार प्राप्त हो रही है उसे झोन लेव्हल पर निपटाने के लिये नझुल, एन.आय.टी, एस.एन.डी.एल, इन लोगों से चर्चा करके तरंतु रिपोर्टींग करना चाहिये। एल.ए.डी. लाईट के संदर्भ में शहर मे लोग चर्चा कर रहे है। एल.ए.डी. लाईट का विषय क्लीअर हो गया है। लोग पुछ रहे है की लाईट कबसे लगेंगें। यह काम तुरंत शुरु होने चाहियें । जिन मा.सदस्यों ने अपने अपने प्रभागों मे लाईट प्रपोज किये है वहापर तुरंत लाईट लगने चाहियें। देखने मे आ रहा है की कई जगह केबल लग गये है, पोल खडे हो गये है लेकीन लाईट नही लगे है। मा.सदस्यों ने जिन पोलोपर लाईट लगवाने के लिये कहा है वहापर समप्रमाण मे एल.ए.डी. लाईट तुरंत लगवाने चाहियें।

**ठराव क्रमांक 429** :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर